**ADVERTISEMENT** **Date. 20March2025**

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

| अ.क्र. | विभाग | भरावयाची पदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | प्रशासन /भांडार/लेखा विभाग/प्रशिक्षण विभाग | ४ | BA,B Com (मराठी इंग्रजी टंकलेखन असल्यास प्राधान्य ) |
| २ | जीव रसायनशास्त्र विभाग | १ | Biochemistry,Biotech,Life Science & any subject of allied science |
| ३ | रसायनोपचार विभाग | १ | Chemistry,Bioanalytical,Pharma, Biotechnology & any subject of allied science |
| ४ | प्राणीजन्य मानवी रोग शास्त्र विभाग | १ | Zoology,Biotechnology & any subject of allied science |
| ५ | विषाणू शास्त्र विभाग | १ | Microbiology, Biotechnology, DMLT,CMLT,Biotech& any subject of allied science |
| ६ | विषविज्ञान | १ | Microbiology,Zoology,Pharma, Biotechnology & any subject of allied science |
| ७. | एकूण | ९ | |

**<u>उमेदवाराची पात्रता</u>** –

- उमेदवार महाराष्ट्राचा रहीवासी असावा.
- उमेदवाराची आधार नोंदणी असावी.
- उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.
- उमेदवाराची कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी असावी.

**<u>उमेदवाराची शैक्षणिक पात्रता:</u>**

१. उमेदवारांची किमान शैक्षणिक पात्रता पदविका/पदवीधर/ असावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत.
२. मराठी व इंग्रजी यांचे टंकलेखन असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
३. BSc in Chemistry,Microbiology,Biochemistry,Zoology,Biotech, Bioanalytical, B Pharm,PG-MLT,DMLT & any subject of allied Science.

५

**योजनेचे नियम व अटी खालीलप्रमाणे:**

१. सदर कार्यप्रशिक्षण कालावधी ११महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना या शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.

२. सदर विद्यावेतन लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात DBT द्वारे शासनामार्फत जमा करण्यात येईल.

3. उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल 35 वर्ष असावे.

४. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहीवासी असावा.

५. उमेदवाराची आधार नोंदणी असावी.

६. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.

7. उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

8. या योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या या योजनेसाठीच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

9. सदर कार्य प्रशिक्षणचा कालावधी ११ महिने असेल. सदरच्या अकरा महिन्याच्या कालावधीसाठी उमेदवारांना या योजनेंतर्गत शासनामार्फत दरमहा १०,०००/- (दहा हजार) रुपये विद्यावेतन देण्यात येईल.

10. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेकडून प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात येईल.

11. या योजनेंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही.

12. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन अनुज्ञेय राहणार नाही.

13. प्रशिक्षणार्थीने वरील अटीची पूर्तता केली असली परंतु सदर प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाच्या पहिल्याच महिन्यात प्रशिक्षण सोडून गेल्यास असा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनास पात्र राहणार नाही.

14. या योजनेच्या दरम्यान प्रशिक्षणार्थीस कायम / नियमित स्वरूपाचा रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण सोडून गेल्यास अथवा अनाधिकृत गैरहजर राहिल्यास या योजनेंतर्गत प्रशिक्षण व त्या अनुषंगाने विद्यावेतन घेण्यासाठी पात्र राहणार नाही.

15. या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS /MAPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत.

16. एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.

17. **ऑनलाईन अर्ज भरण्याची वेबसाईट :** https://forms.gle/1vyY7UTV8CUkZwzt8

**ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचण आल्यास संपर्क** training@haffkineinstitute.org

**ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी २४ मार्च २०२५ ते १५ एप्रिल २०२५ सायं.६.०० वाजेपर्यंत**